# मुंबई विद्यापीठ


विद्यार्थी कल्याण विभाग

क.वि.क/48/२०१५

डॉ. मृदुल निळे
प्र.संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०


**परिपत्रक :**

विषय : दि. २७ फेब्रुवारी २०१५ रोजी 'मराठी राजभाषा दिन' साजरा करणे बाबत.

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठाचे सर्व संलग्नित महाविद्यालयांचे/संस्थाचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठातील सर्व संस्थाचे संचालक, विभागांचे प्रमुख, सर ज.जी वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभाग यांना प्रस्तुत परिपत्रकाद्वारे व महाराष्ट्र शासन व मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार असे सूचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयात व विद्यापीठामध्ये 'मराठी राजभाषा दिन साजरा करण्याचा उपक्रम आपल्या शैक्षणिक संस्थेत आयोजित करण्यात यावा. त्यासाठी संलग्नित महाविद्यालयांनी तसेच विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये/संस्थामध्ये आपापल्या वार्षिक अर्थसंकल्पात आवश्यक ती आर्थिक तरतुद करावी.

महाराष्ट्राची राजभाषा आणि लोकभाषा असलेल्या मराठीचे जतन व संवर्धन व्हावे, असा यामागील मुख्य हेतू आहे. सदर मराठी भाषा व वाङ्मय मंडळांतर्गत विविध उपक्रम राबवतांना खालील हेतूंची पूर्तता करण्यात यावी.

१. विद्यार्थ्यांची वाङ्मयीन अभिरूची घडवणा-या उपक्रमांबरोबर त्यांची भाषिक जाणीव समृध्द करणे.
२. अमराठी भाषकांना मराठी भाषेच्या व संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आणणे.
३. साहित्येत्यर व्यवहारक्षेत्रांत मराठी भाषेचा वापर वाढवून मराठीला ज्ञानभाषेची प्रतिष्ठा प्राप्त करून देणे.
४. जागतिकीकरणामुळे एकूणच भारतीय भाषांपुढे उभ्या ठाकलेल्या आव्हानांबाबत जागृती निर्माण करून त्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे.

तरी, सर्व संबधितांना कळविण्यात येते की, मराठी भाषेच्या संवर्धनाबाबत विद्यापीठाला आपले दायित्व नीट पार पाडता यावे म्हणून हा महत्वपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे, या निर्णयाची गांभीर्याने व प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी व तसा अहवाल सदर कार्यालयात सादर करावा ही विनंती.

(डॉ. मृदुल निळे)
प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

मुंबई ४०० ०२०.
दिनांक : ०९ फेब्रुवारी,२०१५.